36

42


# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी, ४१३७२२, जि.- अहमदनगर

फोन :- ०२४२६-२४३२६४ e-mail :- comptroller.mpkv@gov.in


जा.क्र./म.फु.कृ.वि/नियंत्रक/लेखा-२/ ७०/ २०१८ दिनांक - ८ /०५/२०१८

## -: परिपत्रक :-

**विषय :- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये प्रशासकीय मंजुरी मिळालेले प्रस्ताव सन २०१८-१९ मध्ये पुनश्च मंजुरीस्तव सादर न करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये या विद्यापीठातील सर्व योजना प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ महसुली उत्पन्न/भा.कृ.अ.प विद्यापीठ बळकटीकरण योजना (ICAR-SAU)/ दुरुस्ती व देखभाल इ. लेखाशिर्षाअंतर्गत/निधीमधून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये मा.कुलगुरु महोदयांनी प्रशासकीय मान्यता दिलेली असताना वेळेअभावी सदर कार्यवाही सन २०१७-१८ मध्ये पूर्ण न झाल्यामुळे संबंधीत कार्यालये सदर प्रस्ताव पुनश्चः पुढील सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये मा.कुलगुरु महोदयांच्या मंजुरीस्तव सादर करतात व त्यामुळे सदर प्रस्तावांची पुनरावृत्ती होते.

या अनुषंगाने मा.कुलगुरु यांचे मान्यतेने कळविण्यात येते की, लेखासंहिता नियम ६.५ नुसार रु. ३.०० लाखापर्यतच्या खर्चासाठी सन २०१७-१८ मध्ये प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांची ती प्रशासकीय मान्यता लेखासंहिता नियम ६.१२ नुसार सन २०१८-१९ अखेरपर्यंत खालील अटींवर ग्राहय राहील.

१. मागील आर्थिक वर्षामध्ये मंजूर आर्थिक तरतूद /अंदाजपत्रकीय तरतूद/मंजूर वार्षिक नियतव्यय व्यपगत झाला असून प्रस्तावित कामांसाठी निधीची तरतूद सन २०१८-१९ अंदाजपत्रकीय मागणीद्वारे नव्याने करण्यात यावी.
२. विद्यापीठ महसूली उत्पन्न, फिरते निधी,योजनेत्तर देखभाल दुरुस्ती निधी यांमधील सन २०१७-१८ मध्ये देण्यात आलेल्या कामांच्या प्रशासकीय मान्यता ( सन २०१८-१९ मधील नवीन आर्थिक तरतूद करण्यास अधिन राहून ) सन २०१८-१९ साठी लागू राहतील.
३. यामध्ये GOI Funded, ICAR, RKVY व तत्सम राज्य शासन अथवा केंद्र शासन अनुदानीत त्याच कामांचा समावेश असेल, ज्या कामांसाठी सन २०१७-१८ मध्ये प्राप्त अनुदान आवश्यकतेनुसार सन २०१८-१९ मध्ये खर्च करण्यास्तव Revalidation प्राप्त झालेले आहे.

कृ.मा.प.

वरील सुचना विचारात घेऊन मागील प्रशासकीय मान्यतेच्या नस्त्या पुर्नजिवीत करण्यासाठी सादर करण्यात येऊ नयेत आणि सन २०१८-१९ मध्ये आवश्यक निधीसाठी अंदाजपत्रकीय मागणी लागलींच नोंदवावी. अंदाजपत्रकीय मागण्या संकलीत करण्यास्तव स्वतंत्र परिपत्रक जारी करण्यात येत आहे.

**नियंत्रक**
**मफुकृवि, राहुरी.**

प्रतिलिपी खालील अधिका-यांच्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-

१) संचालक, विस्तार शिक्षण/संशोधन/शिक्षण, मफुकृवि,राहुरी.
२) कुलसचिव/विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल मफुकृवि, राहुरी.
३) सहयोगी अधिष्ठाता, प.म./अ.शि.कृ.अभि.महाविद्यालय/कृ.म.कराड/नंदुरबार/पुणे/धुळे/कोल्हापूर.
४) प्रकल्प अधिकारी कृ.म.मुक्ताईनगर/हळगांव.
५) सहयोगी संशोधन संचालक,पुणे/कोल्हापुर/सोलापूर/ईगतपुरी.
६) सर्व विभागप्रमुख/योजनाप्रमुख/प्रभारी अधिकारी.
७) विद्यार्थी कल्याण अधिकारी,म.फु.कृ.वि.,राहुरी.
८) अधिदान व लेखा अधिकारी कृ.म.पुणे/धुळे/कोल्हापुर/राहुरी.
९) सहा.नियंत्रक (१) तथा अति.अधिदान व लेखा अधिकारी, म. फु. कृ. वि.,राहुरी.
१०) मा.कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक, म. फु. कृ. वि.,राहुरी.